सप्टेंबर- २०२३ * अंक- ३ रा

# अजिंठा

## रोटरी क्लब जळगाव

क्लब क्र.15512 रो.डिस्ट्रीक्ट 3030 रोटरी वर्ष 2023-24





आर.आय.प्रेसिडेंट
रो. गॉर्डन आर. मॅकइनली



डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
रो. आशा वेणुगोपाल



प्रेसिडेंट
रो. मनोज जोशी



ऑन.सेक्रेटरी
रो. ॲड. हेमंत भंगाळे



बुले.कमिटी चेअरमन
रो. स्वाती ढाके

CREATE HOPE in the WORLD

## संपादकीय....

सर्व बंधू भगिनींना रोटरी प्रणाम!

मागील महिन्यात वर्ध्या येथे डिस्ट्रीक्ट ॲवार्ड फंक्शन झाले. त्यात आपल्या क्लबला ॲवार्ड मिळाले ते पुढील पानावर दिलेले आहे. पण योगायोग असा की सतत तीन वर्ष झाले, आपल्या 'अजिंठा' बुलेटिनला डिस्ट्रीक्ट ॲवार्ड मिळत आहे. तेही एकाच संपादकाच्या संपादकत्वाखाली तीन वर्षापूर्वी काही अपरिहार्य कारणांमुळे बुलेटिनचे काम माझ्यावर सोपवण्यात आले. ते सोपवतांना आपल्या माजी अध्यक्षा प्रा.मंगला जंगले मॅडम यांनी मला एक छान से स्वप्न दाखवले आणि आज यशाची हॅट्रीक करून त्यांचे स्वप्न मी पूर्ण केले.

या यशात माझा एकटीचाच वाटा नाही, तर सर्व सदस्यांनी मला सहकार्य केले. खरे तर कोरोना काळात खूप समस्या उद्‌भवल्या नंतरच्या काळातही वेगवेगळ्या समस्यांना सामोरे जात आम्ही यशाची हॅट्रीक साधू शकलो याचा खरा आनंद आहे.

सप्टेंबर हा 'शिक्षण आणि साक्षरता' महिना आहे. 'राष्ट्रीय साक्षरता मिशन' १९८८ साली सुरू झाले. तरीही आजपर्यंत ७५% लोक साक्षर झाली आहेत. आपल्याला रोटरी मार्फत या कार्याला हातभार लावावयाचा आहे. रोटरी तर्फे 'रोटरी इंडिया लिटरेसी मिशन' राबविण्यात येते. त्या दृष्टीनेच सध्या आपल्या क्लब तर्फे आनंदघर येथे प्रौढ साक्षरता वर्ग सुरू आहे. त्यासाठी रो.शुभदा कुलकर्णी व सौ.विनया जोशी (फर्स्ट लेडी) या खूप मेहनत घेत आहेत.

आपल्या क्लबचे माजी अध्यक्ष रो.अशोक जोशी यांनी सुरू केलेला ७X७X७ प्रोजेक्ट बद्दल सविस्तर माहिती पान नं. ७ वर देत आहे. या अनोख्या प्रोजेक्टला थोडे वेगळे स्वरूप देण्याचे काम या वर्षीचे कमिटी चेअरमन रो.सुबोध सराफ यांनी केले आहे. (शाळेतील विद्यार्थी व शिक्षकांचा अभिप्राय रेकॉर्ड करणे) सर्व शाळेतील विद्यार्थीही उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत आहे. सर्व रोटेरीयन्स्‌ना आवाहन आहे की, त्यांनीही या प्रोजेक्ट उपस्थित राहावे. यावर्षीही आपल्या सर्वांची अशीच साथ मिळणार आहे, हीच अपेक्षा ठेवून सर्वांचे पुनश्च धन्यवाद !

**– रो. स्वाती ढाके**

## अध्यक्षीय.....

रोटरी प्रणाम

रोटरीच हे वर्ष चालू होऊन दोन महिने उलटून गेले. मागील महिन्यात प्रामुख्याने आपल्या रोटरी डि. ३०३० च्या प्रांतपाल रो.आशावेणू गोपाल यांनी आपल्या क्लबला ऑफिशीयल भेट दिली. १८ ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता त्यांचे आगमन झाले. व लगेचच त्यांनी कामाला सुरुवात केली. क्लोजडोर मीटिंग मध्ये क्लबचे वार्षिक कार्यक्रम, मागील वर्षाचे अकाउंट्स, व इतर कागदपत्र तपासणी केली. त्यानंतर रोटरी क्लबच्या हॉलवर सर्वांचा ग्रुप फोटो घेण्यात आला. सर्व कमिटी चेअरमन ने आपला वार्षिक लेखाजोखा व संपूर्ण वर्षाचे प्लॅनिंग हे त्यांच्यासमोर सादर केले. या कार्यक्रमानंतर आम्ही आपल्या काही ऑन गोइंग प्रोजेक्ट व काही नवीन प्रोजेक्टच्या उद्घाटनाला मॅडम यांना घेऊन गेलो. तिथेही त्यांनी सर्व प्रोजेक्टची माहिती घेऊन काही सूचना केल्या. संध्याकाळी आमच्या क्लबची फॅमिली मीटिंग होती या मीटिंगमध्ये मॅडम यांनी सर्व क्लब च्या सदस्यांशी ओळख करून, संवाद साधला व वर्षभराकरीता मार्गदर्शन केले. सप्टेंबर महिना हा 'शिक्षण आणि साक्षरता' म्हणून ओळखला जातो. या महिन्यांमध्ये आपण लिटरसी कमिटीच्या अंतर्गत आपण काही प्रौढ शिक्षणाचे कार्यक्रम घेत आहोत या कार्यक्रमांमध्ये आपल्याला रोटरी ॲन्स चे भरीव सहकार्य पण लाभत आहे.

सेवन बाय सेवन आपला प्रोजेक्ट जोरात राबवला जात असून त्यासंदर्भातले पॉझिटिव्ह फीडबॅक हे इंटरॅक्ट माध्यमातून आपल्यासमोर येत आहेत. जवळजवळ सर्व शाळांमधून इंटरॅक्ट क्लब ची स्थापना झाली. यावेळी आपण तेथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. सप्टेंबर महिन्यात पायाभूत शिक्षण यावर आपण एक मीटिंग घेणार आहोत. त्यानंतर पावसाळा चालू झालाय. सगळीकडे हिरवीगार झाडांची चादर पसरलेली आहे. या संपूर्ण वातावरणात आपल्या क्लबच्या महिला सदस्यांकडून एक सुंदर असा कविता वाचनाचा एक आपण प्रोग्राम घेणार आहोत. या मध्ये फक्त जळगाव जिल्ह्यातील कवींचा आपण समावेश केलेला आहे. ह्या वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमाला सर्वांनीह उपस्थित रहावे. या महिन्याचे प्रोजेक्ट गरोदर महिलांना औषधाचा आणि प्रोटीनच किट देणे. मोतीबिंदूचे ऑपरेशन व इतर असे अनेक प्रोजेक्ट आपण घेणार आहोत.

**– रो. मनोज जोशी**

# ऑगस्ट महिन्यातील साप्ताहिक सभा




**✻ ४ ऑगस्ट –** रोजी झालेली साप्ताहिक सभा ही 'ब्रिंग वन इच वन' या शिषकांतर्गत ठेवलेली होती. ऑगस्ट हा महिना 'रोटरी मेंबरशीप ॲन्ड डेव्हलपमेंट' म्हणून डेसिग्नेटेड मंथ होता. यावेळी रो.डॉ.जयंत जहागीरदार, रो.ॲड.प्रविणचंद्र जंगले, रो.राघवेंद्र काबरा, रो.प्रेम कोगटा, रो.केदार मुंदडा, रो.कंवरलाल संघवी, ॲड.सागर चित्रे यांनी मार्गदर्शन केले.

**✻ ११ ऑगस्ट–** रोजी झालेली साप्ताहिक सभा ही फॅमिली मिटींग होती. 'अवयव दान व अवयव प्रत्यारोपण' या विषयावर डॉ.नंदकिशोर कापडीया (कार्डीओलॉजीस्ट), आणि डॉ.विनायक निकम (एच.पी.बी. आणि लिव्हर प्रत्यारोपण) (कोकीळाबेन धिरूभाई अंबानी हॉस्पीटल ॲन्ड मेडीकल रिसर्च इन्स्टिट्युट ) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी परिचय डॉ.मिलिंद वायकोळे यांनी करून दिला तर आभार प्रदर्शन डॉ.शशिकांत गाजरे यांनी केले.







**✻ १८ ऑगस्ट –** रोजी आपल्या क्लबला डी.जी. आशा वेणुगोपाल यांची ऑफिशीयल भेट झाली. या निमित्त दिवसभर झालेले प्रोजेक्ट व सभा घेण्यात आली. याची माहिती पान नं. ५ वर आहे.

**✻ २५ ऑगस्ट–** रोजी झालेली साप्ताहिक सभेचा 'प्रसार माध्यमान पुढील आव्हाणे' हा विषय होता, तर यावेळी निवडक दैनिकांचे व वाहिन्यांचे संपादक आमंत्रित होते. या चर्चासत्रात रो.राजेश यावलकर व रो.आसिफ मेमन सह वृत्तपत्राचे संपादक लोकमत श्री.रवि टाले, दिव्य मराठीचे श्री.दिपक पटवे, लोकशाहीचे श्री.सुभाष भोळेसर, साईमतचे श्री.प्रमोद बऱ्हाटे, लाईव्ह ट्रेंडचे शेखर पाटील, देशोन्नतीचे श्री.मनोज बारी यांनी सहभाग नोंदविला.



# ऑगस्ट महिन्यातील प्रोजेक्टस्



**✻ ५ ऑगस्ट–** रोजी उमाळा येथे विपश्यना केंद्र येथे रोटरी क्लब जळगाव यांचे तर्फे २०० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अध्यक्ष रो.मनोज जोशी, मा.स.रो.ॲड. हेमंत भंगाळे, नॉन मेडीकल चेअरमन जितेंद्र ढाके, प्रकल्प प्रमुख किशोर तलरेजा, एन्व्हायरमेंट कमिटी चेअरमन सुभाष अमळनेरकर, रो.डॉ.जयंत जहागीरदार, रो.राजेश वेद, रो.संदीप शर्मा, रो. नित्यानंद पाटील, रो.उदय पोतदार, रो.रविंद्र हासवानी, रो.अमोल पाटील, रो.निलेश

**✻ ७ ऑगस्ट–** सध्या डोळ्यांची तीव्र स्वरूपाची साथ सुरू असल्याने माध्यमिक आश्रमशाळा डोमगाव, ता.जळगाव येथील बरेच विद्यार्थ्यांना डोळ्यांचा त्रास होत असल्याने तातडीने मेडीकल कमिटी चेअरमन डॉ.तुषार फिरके यांनी विद्यार्थ्यांची तपासणी करून मोफत आय ड्रॉप व औषधीची वाटप करण्यात आले व डोळ्यांची निगा कशी राखावी यावर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अध्यक्ष मनोज जोशी, मानद सचिव ॲड.हेमंत भंगाळे व रो.जितेंद्र ढाके, रो.डॉ.सुनिल सुर्यवंशी उपस्थित होते.





**✻ १६ ऑगस्ट–** पोलाद स्टील व रो.क्लब जळगावच्या संयुक्त विद्यमानाने डोमगाव येथील आश्रमशाळेतील ४०० विद्यार्थ्यांना मोबाईल तारांगणा द्वारे ग्रह ताऱ्यांची माहिती देण्यात आली. यावेळी अध्यक्ष मनोज जोशी, मा.स.हेमंत भंगाळे, रोटा कीड कमिटीचे चेअरमन रो.चंदन महाजन, माजी अध्यक्ष जितेंद्र ढाके, स्वाती ढाके, आश्रमशाळेचे शिक्षक वृंद आदी उपस्थित होते. नॉन मेडीकल कमिटी तर्फे ४ सिलींग फॅन आश्रमशाळेला देण्यात आले.

दि. १८ ऑगस्ट रोजी प्रांतपाल रो.आशावेणु गोपाल यांनी आपल्या क्लब ला ऑफीशिअल भेट दिली, त्यांच्या उपस्थितीत झालेल्या सर्व प्रोजेक्टची माहिती पान नं. ५ वर आहे.




**✻ २० ऑगस्ट–** रोजी रोटरी क्लब जळगाव आणि माधवराव गोळवलकर स्वयंसेवी रक्तपेढी यांचे संयुक्त विद्यमानाने व आपल्या क्लब चे मेंबर रो.किशोर तलरेजा परिवाराच्या सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी ३१ रोटरी मेंबर्सनी रक्तदान शिबिरात सहभाग घेतला.

# शिक्षण आणि साक्षरता महिना

पी.पी.रो. डॉ. तुषार फिरके



सप्टेंबर महिना हा रोटरी चा शिक्षण आणि साक्षरता महिना आहे. १५ वर्षांवरील ७७५दशलक्षाहून अधिक लोक निरक्षर आहेत. हे जगातील प्रौढ लोकसंख्येच्या १७ टक्के आहे. मूलभूत शिक्षण आणि साक्षरतेला समर्थन देण्यासाठी समुदायांची क्षमता मजबूत करणे, शिक्षणातील लैंगिक असमानता कमी करणे आणि प्रौढ साक्षरता वाढवणे हे आमचे ध्येय आहे. रोटरी सर्व मुलांसाठी शिक्षण आणि मुलांसाठी आणि प्रौढांसाठी साक्षरतेचे समर्थन करते. रोटरी विविध उपक्रमांमधून साक्षरता वाढवण्याचा प्रयत्न करत असते.

टीचर ट्रेनिंग– आम्ही सर्व वयोगटांमधील लोकांना शिकण्याची प्रेरणा देण्यासाठी शिक्षकांना सक्षम करण्यासाठी कार्य करतो. रोटरी आपले ज्ञान आणि अनुभव जे गरीबीखालील लोकांसोबत काम करतात, त्या शिक्षक आणि इतर व्यावसायिकांसोबत शेअर करतो. प्रौढ साक्षरता – रोटरी सदस्य सामुदायिक साक्षरता कार्यक्रम ऑफर करण्यासाठी स्थानिक वकिलांसोबत काम करून प्रौढ निरक्षरता कमी करण्यासाठी लढा देतात. रोटरी शिष्यवृत्ती – रोटरी सदस्य आपल्या समाजाला बदलण्याची क्षमता असलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या भविष्यासाठी गुंतवणूक करतात.

निर्वासितांना शिक्षण देणे– नायजेरियातील निर्वासितांना शिक्षण आणि अन्न मिळवून देण्यासाठी विद्यापीठाचे अध्यक्ष आणि रोटरी क्लब बोको हरम यांच्याशी लढा देत आहेत. शिक्षकांना प्रशिक्षण देणे.– मुलांना शाळेत आणणे पुरेसे नाही हे लक्षात घेऊन, रोटरी शिक्षकांना मार्गदर्शन (मेंटॉरशिप) आणि प्रशिक्षण देते. कॅरोलिन जॉन्सनच्या ग्वाटेमालाच्या मध्यवर्ती उच्च प्रदेशांच्या दुस–या भेटीच्या वेळी, तिला प्रथम श्रेणीतील शिक्षक भेटले ज्याने धक्कादायक कबुली दिली. ग्वाटेमाला साक्षरता प्रकल्पात भाग घेण्यापूर्वी, शिक्षकांना खात्री होती की तिचे विद्यार्थी वाचायला शिकू शकत नाहीत. 'जॉन्सन म्हणतात, जो रोटेरियन आहे त्याने प्रकल्पासाठी अभ्यासक्रम डिझाइन करण्यात मदत केली आणि आता ग्वाटेमाला साक्षरता प्रकल्पासाठी तांत्रिक सल्लागार म्हणून काम करते.

शाळा स्वातंत्र्य 'रोटेरियन ॲक्शन ग्रुप अगेन्स्ट स्लेव्हरी ' या रोटेरियन्सकडे स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या आधुनिक गुलामगिरीशी लढण्यासाठी एक धोरण आहे. गुलामगिरी ही भूतकाळातील शोकांतिका होती असे अनेकांना वाटेल, परंतु सत्य हे आहे की ते आजही अस्तित्वात आहे, जगभरात ४६ दशलक्ष लोक गुलाम आहेत. रोटेरियन ॲक्शन ग्रुप अगेन्स्ट स्लेव्हरी कडे स्थानिक पातळीवर काम करत या भीषण समस्येशी लढण्यासाठी एक धोरण आहे. ही एक रोटेरियन वृत्ती आहे – तुम्ही त्यांना एक समस्या देता आणि निराश होऊन हात वर करण्याऐवजी ते त्याकडे तुकड्या–तुकड्या मधून काम करु लागतात, ''कृती गटाचे सदस्य कॅरोल हार्ट मेट्झकर म्हणतात. 'माझ्या हयातीत कदाचित गुलामगिरी सोडवली जाणार नाही, पण आणखी दोन वर्षात आम्ही संपूर्ण गाव मुक्त करणार आहोत.'

ईशान्य भारतातील एका गावात, कृती गट कर्जाच्या बंधनाची समस्या हाताळत आहे. १३ क्लबच्या मदतीने, रोटरी क्लब ऑफ बिंगहॅम्टन, न्यूयॉर्क, यूएसए आणि इतर स्त्रोतांद्वारे जिल्हा अनुदान, ॲक्शन ग्रुप स्कूलस् फॉर फ्रिडम या संस्थेचा प्रकल्प, स्कूलस् फॉर फ्रिडम च्या कामासाठी ३६,००० प्रदान करत आहे. स्कूलस् फॉर फ्रिडम कर्जाच्या गुलामगिरीशी लढण्यासाठी स्थानिक भागीदार संस्था मानव संस्था इवम महिला विकास संस्थेसोबत काम करते. रागाज् प्रकल्प यापैकी एका गावात तीन वर्षांच्या प्रयत्नांना मदत करत आहे. उत्तर प्रदेश राज्यात असलेल्या गावाचे नाव गावकरी आणि मदत कर्मचा–यांच्या सुरक्षेसाठी गुप्त ठेवण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे– रोटरी क्लब यशस्वीतेसाठी सेलिब्रिटी आणि सीईओ मार्गदर्शकांसह विद्यार्थ्यांना जोडत आहेत. (मेंटॉरशीप)कोणताही क्लब प्रोग्रामच्या वेबसाइट, rotarystudentprogram.org वरील सामग्री वापरून स्वतःचा मार्गदर्शन कार्यक्रम सेट करू शकतो, ज्यामध्ये प्रचारात्मक पोस्टर्स, निबंध अनुप्रयोग आणि कार्यक्रम घोषणांचा समावेश आहे. कार्यक्रमासाठी दर वेळेस (स्टेप बाय स्टेप) सूचना देखील देते, शाळेच्या अधिका–यांशी संपर्क साधण्यापासून विद्यार्थ्यांना सादरीकरणासाठी परत आमंत्रित करुन अशा विविध उपक्रमांना चालना रोटरीयन्स देऊ शकतात. रोटरी फाउंडेशन जगभरातील शिष्यवृत्ती, देणग्या आणि सेवा प्रकल्पांद्वारे शिक्षणास समर्थन देते.

# प्रांतपाल रो.आशावेणु गोपाल यांची क्लबला भेट..

रो. ॲड. हेमंत भंगाळे



रोटरी क्लब ३०३० चे प्रांतपाल आशा वेणूगोपाल यांनी रोटरी क्लब जळगाव येथे १८ ऑगस्ट २०२३ रोजी भेट दिली. रोटरी क्लब जळगाव यांनी त्याकरिता कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते, त्यात सकाळचे सत्रात क्लब ला भेट देऊन क्लब असेंब्ली घेऊन कमिटी चेअरमन यांना मार्गदर्शन केले, त्यानंतर रोटरी क्लब जळगाव यांनी १६ गरीब व गर्भवती महिलांना दत्तक घेऊन त्यांचे आरोग्याची काळजी घेणार असून त्यांना प्रोटीन व औषधी प्रांतपाल यांचे हस्ते देण्यात आल्या, रो.डॉ.तुषार फिरके यांचे विष्णुलीला हॉस्पिटलमध्ये क्लब तर्फे ११रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केलेल्या असल्याने प्रांतपाल यांनी तेथे भेट दिली. त्यानंतर रो.डॉ. शशिकांत गाजरे यांचे हॉस्पिटलमध्ये रुग्णांना हिपॅटायटीस बी या लसीकरण मोफत देण्याचा शुभारंभ करण्यात आला. दुपारचे सत्रात काशीबाई उखजी कोल्हे विद्यालयात प्रांतपाल यांचे हस्ते विद्यार्थ्यांना उपयोगी असे ग्रंथालयाला पुस्तके भेट देण्यात आली.

प्रांतपाल आशा वेणूगोपाल यांनी रोटरी क्लब जळगाव यांचे सदस्यांना मोलाचे मार्गदर्शन करून डिस्ट्रिक्ट प्रोजेक्ट बद्दल माहिती दिली यावेळी अध्यक्ष मनोज जोशी,मानद सचिव रो.ॲड .हेमंत भगाळे व क्लब चे सर्व सदस्य उपस्थित होते.















# रोटरी एक समाजसेवेचे माध्यम

रो.डॉ.प्रज्ञा जंगले



रोटरी क्लबशी माझा परिचय १९९० पासून आला. त्यावेळेस रो.जगदीशभाई जाखेटे क्लबचे अध्यक्ष होते. त्यानंतर रो.डॉ.किशन काबरा, रो.रमेश लाहोटी, रो.जयंत जहागिरदार, रो.प्रकाश दप्तरी, रो.अशोक जोशी, क्लबचे अध्यक्ष असतांना क्लब तर्फे राबविल्या गेलेल्या विविध प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली. विशेषत: रोटरी कॉन्फरन्स ला आम्ही सगळे मिळून जात असू.

२००७–०८ व २००८–०९ या दोनही वर्षात अनुक्रमे रो.प्रकाश दप्तरी व रो.प्रविणचंद्र जंगले अध्यक्ष असतांना महिला कमिटीची अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली. या दोनही वर्षात अनेक उपक्रमांसोबतच विविध विषयांमधील तज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली. त्यातील जलसंवाद मासिकाचे संपादक दत्ता देशकर यांचे ‘जलसंवर्धन काळाची गरज, व मंजुषा कुलकर्णी यांचे ‘भारतीय संस्कृती व पर्यावरण रक्षण, डॉ.मिरजकर यांचे १२ वी नंतर च्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन, डॉ.स्वाती संवतकर व डॉ.मिलिंद पंडीत यांचे ‘पर्जन्य जल संकलन’ होत.

याशिवाय डॉ.जयंत जहागिरदार अध्यक्ष असतांना मुलजी जेठा महाविद्यालयात व मुलींच्या वसतीगृहात ‘रूबेला लसीकरणाचा, कार्यक्रम ३,४ वर्षे सातत्याने राबविला गेला.

२००८ पासून २०१०–११, २०११–१२ व २०१७–१८ या वर्षात रोटरीच्या मेडीकल कमिटी तर्फे पाल जवळील आदिवासी बहुल क्षेत्रातील बांधवांसाठी वैद्यकीय तपासणी व मोफत औषधी वितरणाचा कार्यक्रम क्लब तर्फे राबविण्यात आला. त्यात आम्ही सर्व भगिनी स्वयंसेवक म्हणून इतर सर्व जबाबदाऱ्या सांभाळत असत.


२०१३–१४ वर्षात डॉ.सतिश शिंदाडकर अध्यक्ष असतांना मी रोटरी क्बलचे सदस्य झाले. महाविद्यालयात कार्यरत असल्याने खेड्यापाडण्यातून येणाऱ्या परंतु परिस्थिती अभावी शिक्षण घेतांना अनेक अडचणींना विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्यासाठी आपणाला क्लब तर्फे काही मदत करता येईल का? या हेतूने मी ‘रोटरी विद्यार्थी दत्तक योजने’ची कल्पना क्लब मध्ये मांडली व त्यातून अनेक दात्यांनी आपली सहमती दर्शविली. ही योजना २०१४–१५ वर्षात १४ विद्यार्थी, २०१५–१६ मध्ये १२ विद्यार्थी व २०१६–२०१७ या वर्षात १० विद्यार्थ्यांना क्लब तर्फे दत्तक घेवून आर्थिक सहकार्य केले व त्यातून त्यांचे शिक्षण पूर्ण करण्यास हातभार लागला.

याशिवाय पर्यावरण समिती, साक्षरता कमिटी, वृक्षलागवड, जलपुर्नभरण इ. समित्यामध्येही काम करण्याची संधी मिळाली. रोटरी क्लब च्या कार्यामुळे अनेक सामाजिक संस्थांची ओळख झाली. तसेच रोटरीत अनेक चांगले पारिवारीक संबंधाचे स्नेहीजन मिळाले. ही माझ्यासाठी महत्त्वाची बाब ठरली.

# ७X७X७ प्रोजेक्ट २०२३-२४

दरवर्षा प्रमाणे यावर्षीही आपला हा प्रोजेक्टची जोरदार सुरूवात झाली आहे. कमिटी चेअरमन सुबोध सराफ यांचे मार्गदर्शनाखाली १५ शाळांमध्ये १५ वक्ते (आपल्या क्लबचे सदस्य) दर महिन्याला शाळांमध्ये जावून मुलांशी सुसंवाद साधत आहे. त्या शाळांची व वक्त्यांची नावे खालीलप्रमाणे :-

| शाळा | वक्ते | | विषय |
|---|---|---|---|
| १.शकुंतला माध्यमिक विद्यालय | १.रो.डॉ. प्रदीप जोशी | – | आपल्या मानसिक क्षमता |
| २.बाहेती हायस्कूल | २.रो.अडॅ.श्रीकांत भुसारी | – | कायदा समजून घ्या |
| ३.श्रीराम माध्यमिक विद्यालयात | ३.रो.कवंरलाल संघवी | – | संस्कार आणि सहनशीलता |
| ४.संत हरदासराम हायस्कूल. | ४.रो.डॉ. शुभदा कुलकर्णी | – | संगीतमय आयुष्य |
| ५.आदर्श सिधी हायस्कूल | ५.रो.डॉ.सतीश शिंदाडकर | – | तुमच्या घरातील दवाखाना |
| ६.नंदिनीबाई मुलीचे विद्यालय | ६.रो. डॉ.क्षमा सराफ | – | नाटकातून व्यक्तिमत्व विकास |
| ७.का.ऊ. कोल्हे विद्यालय | ७.रो.गिरीश कुलकर्णी | – | यश म्हणजे काय |
| ८.या.दे .पाटील विद्यालय | ८. रो.अडॅ.सागर चित्रे | – | मैदानी खेळ घडवतात व्यक्तिमत्व |
| ९.भगीरथ हायस्कूल | ९.रो.डॉ. प्रज्ञा जंगले | – | पर्यावरण आणि आपण |
| १०.प.न. लुंकड मुलीचे विद्यालय | १० रो. स्वाती ढाके | – | वाचाल तर वाचाल |
| ११.ला.ना.हायस्कूल | ११.रो.पंकज व्यवहारे | – | करियर आणि एनईपी२०२० |
| १२.पि.के. गुळवे मुलीचे विद्यालय | १२.रो.जय नेवे | – | छत्रपती शिवरायांचे व्यवस्थापन |
| १३.शारदा माध्यमिक विद्यालय | १३.रो. मकरंद डबीर | – | तांत्रिक शिक्षणाचा मंत्र |
| १४.ए.टी.झांबरे विद्यालय | १४.रो.जयेश ठाकूर | – | नागरिक शास्त्र का? |
| १५. जिजामाता विद्यालय | १५. रो.अमोल पाटील | – | बचतीची सवय. |












## जीवेत् शरदः शतम्...!

१) ८ सप्टेंबर रो. चंदन वासुदेव महाजन
२) १० सप्टेंबर रो. त्रिभुवन शहा
३) १० सप्टेंबर रो. रितेश जैन
४) १५ सप्टेंबर रो. पराग जहागिरदार
५) १५ सप्टेंबर रो. कंवरलाल संघवी
६) १८ सप्टेंबर पीपी रो. संदीप शर्मा
७) १९ सप्टेंबर रो. डॉ. रोहन बोरोले
८) २४ सप्टेंबर पीपी रो. पुनम मानुधने
९)२५ सप्टेंबर रो. राजेश यावलकर
१०)२६ सप्टेंबर रो. नारायण लाठी
११)२९ सप्टेंबर पीपी रो. डॉ. दिपक पाटील

## रो.वर्ष २०२२-२३ डिस्ट्रीक्ट अ‍ॅवॉर्ड

* ट्रॉफी फॉर बेस्ट बुलेटीन इन मराठी
* ट्रॉफी फॉर बॅलन्स प्रोग्राम
* रोटरी सायटेन्शन अ‍ॅवॉर्ड
* डिस्ट्रीक्ट टीआरएफ सायटेन्शन अ‍ॅवॉर्ड
* रेक्गनायझेशन फॉर मॅक्झीम हार्ट सर्जरी
* रेक्गनायझेशन फॉर इन्ट्रॅक्ट अ‍ॅक्टीव्हीटी
* रेक्गनायझेशन फॉर कमिटी अवरनेस




## अभिनंदन!

* थिएटर आम्रपाली संस्थेच्या उपाध्यक्षपदी रो.सुबोध सराफ तर रो.डॉ.जयंत जहागीरदार व डॉ.रो.क्षमा सराफ यांची सदस्य पदी निवड करण्यात आली.
* रोटरी क्लब तर्फे माजी अध्यक्षा रो.पुनम मानुधने मॅडम यांना रोटरी क्लब स्टार तर्फे 'रोटरी कार्य गौरव पुरस्कार', स्व.डॉ.प्रताप जाधव यांच्या स्मणार्थ देण्यात आला.
* उद्योग क्षेत्रातील अतुलनीय कामगिरी बद्दल श्री.अशोक जैन यांना एबीपी माझाचा 'माझा सन्मान' पुरस्काराने गौरिवण्यात आले.
* रो.आसिफ मेमन यांचे चिरंजीव अरहम मेमन यांस ज्युनिअर चेस मॅच मध्ये बक्षीस प्राप्त झाले.
* रो.सुबोध सराफ यांना कॅरम स्पर्धेत बक्षीस प्राप्त झाले.

## * श्रद्धांजली *



* रो.राकेश चव्हाण यांचे वडील डॉ. व्ही. आर. पाटील यांचे दु:खद निधन झाले.